IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

# रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा व पर्यटन विकास

**प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे**
इतिहास विभाग,
कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, उरण- रायगड, नवी मुंबई

**गोषवारा:**

रायगड जिल्हा हा छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी किल्ले रायगड या नावावरून ओळखला जातो. रायगड जिल्हा आणि परिसर ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहेच तसेच वर्तमान दृष्टीने विचार करता मुंबईच्या जवळ असलेला अत्यंत महत्त्वाचा जिल्हा आहे. या जिल्ह्यात अलिबाग, काशीद, मांडवा, किहिम, हरिहरेश्वर, आक्षी,नागाव, मुरुड जंजिरा इत्यादी प्रसिद्ध समुद्रकिनारे आहेत. या समुद्रकिनाऱ्यावर हजारो देश - विदेशातील पर्यटक येतात. रायगडची खरी ओळख आहे ती म्हणजे किल्ल्यांचा जिल्हा म्हणून.. एकूण 58 किल्ले रायगड जिल्ह्यात असल्याचे उल्लेख मिळतात. त्यात राजधानी किल्ले रायगड मुरुड जंजिरा,कुलाबा, सुधागड, कर्नाळा,अवचितगड, बिरवाडी, कुरलई,द्रोणागिरी, घोसाळगड, ईर्षाळगड,खांदेरी , उंदेरी, लिंगाणा,सरसगड,प्रबळगड, इत्यादी तसेच अनेक लेणीसमूह रायगड जिल्ह्यात आहेत. त्यामध्ये जगप्रसिद्ध लेणी घारापुरी उर्फ एलिफंटा,कोंढाणे, कुडे,गांधरपाले,कोण,नडसुर इत्यादी. अनेक ऐतिहासिक प्रसिद्ध ठिकाणे जिल्ह्यात आहेत. त्यामुळेच पर्यटन विकासाच्या दृष्टीने या ऐतिहासिक वस्तूंची मोठी भूमिका आहे. त्यामुळे वर्तमानातील पर्यटनाचा विकास हा प्राचीन व मध्ययुगीन काळात निर्माण झालेल्या ऐतिहासिक वारसा व सांस्कृतिक परंपरा यावर अवलंबून आहे.

**बीजशब्द : रायगड, पर्यटन, ऐतिहासिक वारसा.**

**प्रस्तावना :** रायगड जिल्हा भारतातील महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम भागात असुन,कोकण विभागातील एक महत्त्वाचा जिल्हा आहे. या जिल्ह्याचे जुने नाव कुलाबा असे होते. अलिबाग समुद्रातील कुलाबा या किल्ल्यावरून हे नाव पडले होते. माननीय बॅरिस्टर ए.आर. अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी 01 जानेवारी 1981 रोजी हे नाव बदलून रायगड असे केले. मराठा साम्राज्याची राजधानी असलेल्या किल्ल्यावरून जिल्ह्याचे नाव रायगड ठेवण्यात आले. इसवी सन 2011 मध्ये जिल्ह्याची लोकसंख्या 26 लाख 34,200 होती तर शहरी लोकसंख्या 2011 मध्ये 36.91% एवढी होती.रायगड जिल्ह्याच्या शेजारी मुंबई, उत्तरेस ठाणे,पूर्वेस

पुणे, आग्नेयेस सातारा, दक्षिणेत रत्नागिरी जिल्हे आहेत व पश्चिमेस अरबी समुद्र आहे. इसवीसन 1869 मध्ये ठाणे जिल्ह्यातून कुलाबा जिल्ह्याचे विभाजन करण्यात आले होते. लोकसंख्या,औद्योगीकरण व क्षेत्रफळाच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्वात मोठे शहर पनवेल हे आहे. या रायगड जिल्ह्यात अनेक ऐतिहासिक वारसा स्थळे आहेत त्या वारसा स्थळांचा व ऐतिहासिक वास्तूंचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न आहे.

रायगड जिल्ह्यात पनवेल, पेन, कर्जत, खालापूर, उरण, अलिबाग,सुधागड, माणगाव, रोहा, मुरुड,श्रीवर्धन, म्हसळा, महाड, पोलादपूर, तळा असे 15 तालुके असून 7148 चौरस किलोमीटर क्षेत्रफळ लाभले आहे. तर जिल्ह्यातील वार्षिक पर्जन्यमान 3884 किलोमीटर एवढे आहे.[1]रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा खालील प्रमाणे अभ्यासता येईल.

**रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक लेणी वारसा : घारापुरी** तालुका उरण हे आठ चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असलेले एक अत्यंत रमणीय बेट आहे.वन्यसृष्टीच्या चैतन्याने बहरलेल्या बेटावर सुमारे पंधराशे वर्षांपूर्वी म्हणजेच इसवीसनाच्या सातव्या शतकात कोरण्यात आलेल्या अतिशय नेत्रसुखद गुफा असून त्यातील असंख्य शिल्पकृतींचं रेखीवपण, बांधेसुदपना आणि लावण्य इतकं मनोहरी आहे की ते पाहताना माणूस खेळून राहतो. या गुफा म्हणजेच जगातली अजोड शिल्पकलेचा अविष्कार आहेत. घारापुरीच्या विस्तीर्ण परिसरात नऊ लेण्या आहेत. त्यात योगमुद्रातील शिवप्रतिमेचे शिल्प,तांडव अथवा नटराज शिव, दैत्य संहारक शिव, गंगावतरण, शिवपार्वती विवाह, अर्धनारी नटेश्वर, त्रिमुख शिव ही पाषाण शिल्पे अप्रतिम आहेत.[2] मुंबईच्या जवळ असल्यामुळे हजारो देश - विदेशातील पर्यटक घारापुरीला भेट देतात.एक प्रसिद्ध जागतिक वारसा स्थळ म्हणून घारापुरीचा नावलौकिक आहे.

**गांधार पाले** तालुका महाड येथे मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गालगत अतिशय सुंदर असा लेणीसमूह आहे. महाड पासून साधारणता तीन किमी अंतरावर पाले नावाच्या गावाजवळ हा लेणी सुरू आहे. या लेणी समूहात एकूण 28 लेणी आहेत.**पेरीप्लस ऑफ यूरिथ्रीयसी** या ग्रंथांमध्ये या ठिकाणाचा उल्लेख पालाई,पटभाई असा केला आहे. तर इसवी सनाच्या पहिल्या शतकातही ही जागा पालीपट्टण म्हणून ओळखली जात होती. इसवी सन १३० च्या सुमारास कंभोगवंशीय विष्णुपुलीत याचे राज्य येथे होते. त्यांनीच ही लेणी खोदली असावी.[3] लेणी क्रमांक 1 हे सर्वात मोठे स्तूप आहे. येथे एकूण तीन स्तूप लेणी आहेत व बाकी विहार लेणी पाहायला मिळतात. लेणी क्रमांक 27 मध्ये ब्राह्मणी लिपीतील शिलालेख आहे. राष्ट्रीय महामार्ग वरून सहजपणे येण्यासारखी लेणी असल्यामुळे हा लेणीसमुह पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने येतात.

**कुडे- मांदाड,** तालुका माणगाव येथे अप्रतिम बुद्ध लेणी समूह आहे. माणगाव पासून 21 किमी अंतरावर व राजपुरी खाडी पासून तीन किमी अंतरावर कुडे मांदाड दरम्यान हा लेणी समूह आहे. येथे एकूण

26 बौद्ध लेणी व अकरा टाकीचे खोदकाम आहे. कुडे लेण्यात पाच चैत्यगृह असून बाकीची 21 लेणी विहार आहेत. या लेण्यातील गज प्रतिमा पाहण्यासारखी आहे. लेणी क्रमांक एक मध्ये एक शिलालेख असून लेणी क्रमांक पाच मध्ये एकूण तीन शिलालेख आहेत. लेणी क्रमांक सहाच्या पटांगणात सव्वा तीन मीटर उंचीचे दोन दगडी हत्ती आहेत. डावीकडे कमळावर पाय ठेवून बसलेली बुद्धमूर्ती, धम्मचक्र, सहा हरणे,नाग प्रतिमा आहेत. बुद्ध प्रतिमेच्या जवळ चावरधारी आहेत.त्यात एक अवलोकितेश्वराची आहे. बुद्धाच्या मस्तकावर मुकुट धरलेली दोन विद्याधर ही आहेत. येथे एक संस्कृत शिलालेख आहे. पण तो स्पष्ट अस्पष्ट दिसतो.[4] रायगड जिल्ह्यात समुद्रकिनाऱ्यावर येणारे पर्यटक कुडे लेणी समूहासाठी येतात.

**कोंढाणे** तालुका कर्जत येथील बौद्ध लेणी समूह कर्जत पासून सहा किमी अंतरावर आहेत. या लेणी म्हणजे अखंड दगडात कोरलेल्या वास्तुशिल्पांचा उत्कृष्ट नमुना आहेत. प्राचीन काळातील कल्याण व सोपारा बंदरापासून निघून बोरघाट मार्गे भाजे, कार्ले व पुढे तेरपर्यंत जाणाऱ्या प्राचीन व्यापारी मार्गावर या लेणी आहेत.[5] कोंढाणे येथे एकूण आठ लेणे आहेत. लेणी क्रमांक 1 हे प्रसिद्ध चैत्यगृह वास्तुशिल्पीय कोरीव कामाने नटलेले असून ते चापाकार व गजपृष्ठाकृती प्रवर्गातील आहे. या स्तूपात एकूण 32 स्तंभ आहेत. कोंढाणे लेणी समुहात फक्त पहिले आणि दुसरे लेणे महत्त्वाचे आहे. बाकी सर्वजणी साध्या व बहुतांश भग्न असून तेथे शिल्पकला आढळत नाही. अनेक लेणी अभ्यासक व काही पर्यटक तसेच शाळा महाविद्यालयाच्या अभ्यास सहली कोंढाणे लेणी समूह पाहायला जातात. याशिवाय सुधागड तालुक्यात खडसांबळे येथे पालीपासून सुमारे 33 किमी पूर्वीच असलेल्या गावाच्या अतिशय अवघड ठिकाणी दोन लेणी समूह आहेत या लेणीला नेनवली लेणी असेही संबोधतात.[6] पण तेथे पर्यटक जात नाहीत निश्चितच जिल्ह्यात या विविध लेणी समूहांकडे आकर्षित होऊन अनेक पर्यटक लेणी समूह पाहण्यासाठी येतात.

**रायगड जिल्ह्यातील किल्ले :** सह्याद्रीच्या रांगेवर मध्ययुगीन कालखंडात अनेक किल्ले बांधले गेले. प्रामुख्याने किल्ल्यांचे चार प्रकार महाराष्ट्रात पाहायला मिळतात गिरीदुर्ग, जलदुर्ग, भुईकोट व सागरी दुर्ग सह्याद्रीच्या डोंगररांगांवर शिवकालीन महाराष्ट्रात जास्तीत जास्त गिरीदुर्ग बांधले गेले.त्यांचे मुख्य कारण म्हणजे डोंगरी किल्ले बांधण्यासाठी असलेली पूरक अशी सह्याद्रीची जडणघडण. जलदुर्ग प्रकारातील किल्ले महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावरील अरबी समुद्रातील लहानशा बेटांवर बांधले गेले. या तीनही प्रकारात बांधलेल्या किल्ल्यांचा कालखंड साधारणतः 14 ते 18 वे शतक यामधील आहे.[7] रायगड जिल्ह्यात या काळात अनेक किल्ल्यांची निर्मिती झाली.

**किल्ले रायगड** छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेला किल्ला, छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ज्या किल्ल्यावर झाला तो रायगड छत्रपती शिवाजी महाराजांनी नावारूपाला आणलेला रायगड

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

हा एक साधा पाळेकरांचा किल्ला होता. रियासतकार सरदेसाई यांच्या मते सन 783 च्या काळात राष्ट्रकूट सम्राटांचे मांडलिक दक्षिण कोकणचे शिलाहार यांचे पाळेगार रायगडावर राहत होते.त्या काळात रायगडास तणस, रासविटा, नंदादीप,रायरी ही नावे होती.[8] इसवीसन 1656 मध्ये शिवाजी महाराजांनी जावळीवर आक्रमण करून चंद्रावांचा पराभव केला. मोरे शरण आला आणि रायरी राजांना मिळाला. रायरी स्वराज्याचा आला महाराजांनी तो स्वतः न्याहाळला त्यांचे वर्णन बखरकार करतो " राजा खासा जाऊन पाहता गड बहुत जखोट, चौतर्फा गडाचे कडे ताशील्याप्रमाणे, दिड गाव ,उंच प्रजन्य काळी कडी यावर गवत उगवत नाही आणि धोंडा तासू एकच आहे दौलताबाद हे पूर्ण पृथ्वीवरील सपोर्ट गड खरा पण तो उंचीने थोडका दौलताबादचे दशगुनी गड उंच असे देखून बहुत संतुष्ट झाले आणि बोलिले तक्तास जागा हाच गड करावा " शिवाजी महाराजांनी रायरीचे नाव बदलून रायगड ठेवले.[9] पूर्वेचा जिब्राल्टर म्हणून ओळखला जाणारा रायगड किल्ला जगप्रसिद्ध आहे.

रायगड पाहणे ही अनेकांच्या आयुष्याची जीवन इच्छा असते कारण किल्ले रायगड हा महाराष्ट्र मनाच्या अस्मितेचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे पर्यटक अभ्यासक शिवप्रेमी हजारो संख्येने किल्ले रायगडला भेट देतात व शिवरायांप्रती नतमस्तक होतात गडावर नाणे दरवाजा महादरवाजा तीन मनोरे पालखी दरवाजा राणी वसा बालेकिल्ला अष्टप्रधान मंडळाचे वाढेल धान्य कोठार राज सदर मेना दरवाजा सिंहासनाची जागा नगारखाना होळीचा माळ बाजारपेठ जगदीश्वर मंदिर शिवाजी राजांची समाधी स्थळ इत्यादी वस्तू अत्यंत महत्त्वाच्या आहेत गडाचा माथा पूर्व पश्चिम पसरलेला असून टकमक टोक भवानी टोक व हिरकणी बुरुज हेकडाची तीन टोटके आहेत गंगासागर तलाव कुशावर्त तलाव हत्ती तलाव पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र आहेत.रायगड जिल्ह्याच्या पर्यटन विकास हात किल्ले रायगडची योगदान सर्वात जास्त आहे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या गाथा स्मरण करून पर्यटन गडांचा राजा व राजांचा गड किल्ले रायगड नजरेत साठवतात.

रायगड जिल्ह्यातील दुसरा पर्यटकांचे आकर्षण असलेला किल्ला म्हणजे **जंजिरा** मुरुड तालुक्यात असलेला हा किल्ला अजिंक्य समजला जातो छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात कोंडाजी फर्जंद यांनी हा किल्ला घेण्याचा प्रयत्न केला होता पण तो फसला व कोंडाजी बाबांना आपले प्राण गमवावे लागले एबीसीडी हे जंजिऱ्याचे सिद्धी म्हणून ओळखले जातात त्यांचे मुख्य ठाणे असलेला हा किल्ला. गडावर दोन मोठे तलाव आहेत. जंजिरा किल्ल्यातील मुख्य आकर्षण म्हणजे कलाल बांगडी लांडा कासम व चावरी अशा भल्या मोठ्या लोखंडी तोफा किल्ल्याच्या मध्यभागी एक छोटी टेकडी आहे तटबंदी बांधून ती मजबूत केली आहे तिलाच बालेकिल्ला म्हणता येईल डावीकडे बालेकिल्ल्याच्या उतारावर सिद्धींचा तीन मजली भव्य वाडा आहे गडावर

तीन दर्गे व पाच मज्जिदी आहेत.[10] किल्ले रायगड व जंजिरा नंतर अलिबाग समुद्रकिनाऱ्या लगत असलेल्या **किल्ले कुलाबा** पाहणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. समुद्रकिनाऱ्यावर निसर्ग पर्यटन करताना किल्ले कुलाबा पर्यटकांना खुणावत असतो. मराठा साम्राज्याच्या आरमाराची उत्तर कोकणातील राजधानी असलेला कुलाबा येथे दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे कुलाबा याचा अर्थ समुद्रातील भूशील असा होतो किल्ले कुलाबा आणि कान्होजी आंग्रे यांचे अतूट नाते राहिले आहे छत्रपती शिवाजी राजांनी किल्ला बांधला व किल्ल्याचे नाव जंजिरे कुलाबा असे ठेवले किल्ल्यावर गुडबाय देवी मंदिर बांधू तलाव गणेश पंचायतन मंदिर बाजूला शिव व हनुमान मंदिर भवानी मंदिर हाजी हजरत कलाम कुलाबा किल्ल्याला आज 14 बुरुज आहेत. ऐतिहासिक असलेल्या कुलाबा किल्ला आज पर्यटकांचे आकर्षण बनला आहे.

याशिवाय रायगड जिल्ह्यात हरिहरेश्वर पाली येथील बल्लाळेश्वर दिवेआगार महड गणपती चवदार तळे अशी अनेक ऐतिहासिक ठिकाणी असून ती पर्यटकांचे आकर्षण बनले आहेत.

**सारांश** : भारताचा ऐतिहासिक वारसा हाच खऱ्या अर्थाने जगातील पर्यटकांना आकर्षित करणारा आहे. ताजमहल, लाल किल्ला, वेरूळची लेणी, अजिंठा लेणी, विविध कालखंडात बांधलेली असंख्य मंदिरे,किल्ले, प्राचीन वास्तू हा वैभवशाली ठेवा पाहण्यासाठी पर्यटक येतात. भारत हा निसर्ग सौंदर्याने नटलेला देश आहेच पण त्याचबरोबर अनेक ऐतिहासिक वास्तूंचा देश म्हणून जगात भारताची ओळख आहे. त्या दृष्टीने रायगड जिल्ह्यात अनेक ऐतिहासिक वारसा स्थळे असल्याकारणाने निश्चितच पर्यटक या वारसा स्थळांना भेट देण्यासाठी रायगड जिल्ह्यात येतात. त्यामुळेच या ऐतिहासिक वास्तूंचा सहसंबंध वर्तमान अर्थव्यवस्थेशी निश्चितच जोडता येईल. त्यामुळे हा वैभवशाली वारसा जतन आणि संवर्धनाचे कार्य करणे हे महत्त्वाचे ठरेल.

## संदर्भ ग्रंथसूची

1) mr.wikipedia.org/wiki/ रायगड-जिल्हा.

2) घारापुरीच्या सदाशिवाचा जागतिक वारसा, *एलिफंटा गुफा घारापुरी लेणी*,पृष्ठ क्र. 1.

3) घाणेकर प्र.के, *लेणी महाराष्ट्राची*, स्नेहल प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र.24.

4) कित्ता,पृष्ठ क्र. 22.

5) चौधरी. की.का, डॉ, *रायगड जिल्हा*,महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई. पृष्ठ. क्र. 713.

6) कित्ता, पृष्ठ क्र. 721.

7) डॉ. जोशी सचिन विद्याधर, *दुर्गसंवर्धन*, बुकमार्क पब्लिकेशन, पुणे, ऑक्टोबर 2018, पृष्ठ क्र. 28,29.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

8) राणे सुखद, *येई देशीचे दुर्ग, ओळख रायगड जिल्ह्यातील किल्ल्यांची,* ग्रंथाली प्रकाशन, माटुंगा, मुंबई,मार्च 2023, पृष्ठ क्र.266.

9) कित्ता, पृष्ठ क्र. 267.

10) जोशी सचिन विद्याधर, *रायगड जिल्ह्याचे दुर्ग वैभव,* बुकमार्क पब्लिकेशन, पुणे, 2011, पृष्ठ क्र.84.